**वाचले -**

१ सह आयुक्त, आपत्ती व्यवस्थापन विभाग यांचेकडील पत्र क्र. आपव्य/१/कावि/२२/२०२५ दि. २९/०१/२०२५
२ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१)
३ परिपत्रक क्र.दवनि/१/कावि/९७/२०२२ दिनांक १४/०३/२०२२
४ मा.आयुक्त यांचेकडील दिनांक ०३/०२/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/१/कावि/५०/२०२५
दिनांक०४/०२/२०२५

**विषय** :- नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत...
श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट,सह आयुक्त (सं.क्र.५०४८)

आदेश,

श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "वायरलेस ऑपरेटर" या पदावर दिनांक २०/०९/१९८८ रोजी रुजू झाले असून सद्यस्थितीमध्ये सह आयुक्त या गट 'अ' मधील पदावर कार्यरत आहेत. श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट, सह आयुक्त यांची जन्मतारीख ०१/०६/१९६७ अशी असून दिनांक ३१/०५/२०२५ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्षे पूर्ण होत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१) मधील तरतूदीनुसार श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट, सह आयुक्त यांना दिनांक ३१/०५/२०२५ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट, सह आयुक्त यांचेकडून महानगरपालिकेस नवीन घर कर्ज, घर दुरुस्ती अग्रिम, संगणक अग्रिम, वाहन अग्रिम, कामगार कल्याण निधी अग्रिम, मनपा सेवकांची सहकारी पतसंस्था दाखला व वैद्यकीय अग्रिम येणे बाकी नसून सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसलेने उपरोक्त वाचले क्र.१ चे पत्रान्वये विभागप्रमुखांनी श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट, सह आयुक्त यांना नियत वयोमानाने सेवानिवृत्त करणेबाबत स्पष्टपणे शिफारस केली आहे.

सबब, मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपरोक्त वाचले क्र.४ चे मा.आयुक्त यांचेकडील मान्य प्रस्तावानुसार व उपरोक्त वाचले क्र.३ चे परिपत्रकान्वये आदेश निर्गमित करणेबाबत निश्चित केलेले धोरणानुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील तरतूद विचारात घेता श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट, सह आयुक्त यांना दिनांक ३१/०५/२०२५ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यास प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट, सह आयुक्त यांचे सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति - श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट, सह आयुक्त
प्रत - लेखा विभाग

२/- श्री.इंदलकर चंद्रकांत पोपट, सह आयुक्त यांचेकडून महानगरपालिकेस येणे असलेली रक्कम त्यांना देय असणा-या रकमेतून वजा करुन उर्वरित रकमा त्यांना त्वरीत अदा करण्याची कार्यवाही करणेत यावी.

१.लेखापरिक्षण विभाग २.दूरसंचार विभाग ३.माहिती व जनसंपर्क विभाग ४.कामगार कल्याण विभाग ५.माहिती व तंत्रज्ञान विभाग ६.साप्रवि क्र. ७,१०,१२,२२,संगणक कक्ष ७.पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ ८. आपत्ती व्यवस्थापन विभाग ९. कायदा विभाग १०.सर्व संबंधित विभाग